# आरोग्य विभाग, जिल्हा परिषद सांगली

| | |
|---|---|
| दुरध्वनी - ०२३३- २३७३०३२, २३७४४६२<br>फॅक्स - ०२३३ - २३७४४६२<br>Email Address :- zpdhosan@yahoo.co.in<br>phn.zpsangli@gmail.com | जिल्हा आरोग्य अधिकारी,<br>आरोग्य विभाग, जिल्हा परिषद सांगली कार्यालय<br>सांगली मिरज रोड, सांगली.४१६४१६ |


जा.क्र.आरोग्य/महा.शुश्रु(सु)नियम२०२१/फायर व इलेक्ट्रीक ऑडीट/नाहरकत प्रमाणपत्र/कार्यवाही/१५९१/२४
दि.२८-०३-२०२४

**प्रति,**

तालुका आरोग्य अधिकारी,
पंचायत समिती.....(सर्व) जि.सांगली

**विषय** :- महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी (सुधारित) नियम २०२१ (बॉम्बे नर्सिंग होम ॲक्ट १९४९) अंतर्गत खाजगी रुग्णालय/शुश्रुषागृहांकडून अग्निशमन यंत्रणा व इलेक्ट्रीक ऑडीटबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र प्रमाणित संस्थाकडून घेणेबाबत...

**संदर्भ** :- या कार्यालयाकडील दि.२८/०३/२०२४ रोजीची मंजुर टिपणी..

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास कळविणेत येते कि, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सांगली या कार्यालयामार्फत ग्रामीण भागातील खाजगी रुग्णालयाचे बॉम्बे नर्सिंग होम ॲक्ट १९४९ (महाराष्ट्र शुश्रूषागृह नोंदणी (सुधारित) नियम २०२१) अंतर्गत नोंदणी व नुतनीकरण करण्यात येते.

नोंदणी व नुतनीकरण करतेवेळेस राज्यशासनामार्फत वेळोवेळी विविध कागदपत्रे पूर्तता करुन याअनुषंगाने प्रमाणपत्र अदा करणेबाबत अवगत करण्यात येतो. याअनुषंगाने संदर्भीय मान्य टिपणीनुसार जिल्हयातील खाजगी रुग्णालयांच्या नोंदणी व नुतनीकरण (पुर्नःनोंदणी) प्रमाणपत्र देताना रुग्णालयांत अग्निशमन यंत्रणा, इलेक्ट्रीक ऑडीट बाबतचे नाहरकत प्रमाणपत्र असल्याचे खात्री करणेची आहे.

याअनुषंगाने आपल्या कार्यक्षेत्रामधील महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी (सुधारित) नियम २०२१ (बॉम्बे नर्सिंग होम ॲक्ट १९४९) अंतर्गत सर्व खाजगी रुग्णालय/शुश्रुषागृहांमध्ये खालील सूचनांप्रमाणे कार्यवाही करणेची आहे,

१) सर्व खाजगी रुग्णालयामध्ये अग्निशमन यंत्रणा ऊभारुन रुग्णालयांना अग्निशमन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याचे आहे.

२) ग्रामीण कार्यक्षेत्राकरीता खालील नमूद कोल्हापूर फायर सर्व्हिसेस कोल्हापूर यांचेकडून अग्निशमन नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याचे आहे.

| अग्निशमन विभागाचे पत्ता व संपर्क क्र. | अग्निशमन अधिकारी यांचे नाव |
|---|---|
| Kolhapur Fire Service,<br>Kolhapur Municipal Corporation,<br>Mob.No. 9766532020<br>Email- fire@kolhapurcorporation.gov.in | Shri.R.K. Chile.<br>Fire Officer,<br>Kolhapur Fire Service. |

३) बऱ्याच वेळा रुग्णालयात उपकरणातील बिघाडामुळे जीवीत व वित्त हानी होण्याचा धोका असतो. त्याअनुषंगाने उपकरणांची वेळोवेळी तपासणी / दुरुस्ती करुन घेणे तसेच रुग्णालयांचे इलेक्ट्रीक ऑडीट करुन घेण्याबाबत सर्व खाजगी रुग्णालयांना कळविण्यात यावे.

४) इलेक्ट्रीक ऑडीट बाबतचे नाहरकत दाखला हे शासकिय संस्थेकडून प्राप्त करुन घेण्याचे आहे. उदा. MSEB Department, PWD Department इ.

५) रुग्णालयातील फायर ऑडीट, इलेक्ट्रीक ऑडीट यासाठी आपल्या कार्यक्षेत्रातील सार्वजनिक बांधकाम विभाग आणि कोल्हापूर फायर सर्व्हिसेस कोल्हापूर या अग्निशमन विभाग यांच्याशी नियमित पाठपुरावा करणेचे आहे.

तरी वरील सूचनांचे आपल्या कार्यक्षेत्रामध्ये तंतोतंत पालन करावे. आणि आपल्या कार्यक्षेत्रातील आपल्या मार्फत जिल्हा कार्यालयास पाठविण्यात येणारे खाजगी रुग्णालयांच्या नोंदणी व नुतनीकरण (पुर्नःनोंदणी) प्रस्तावामध्ये रुग्णालयांत अग्निशमन यंत्रणा, इलेक्ट्रीक ऑडीट बाबतचे नाहरकत प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे.

अग्निशमन यंत्रणा, इलेक्ट्रीक ऑडीट बाबतचे नाहरकत प्रमाणपत्र नसलेस खाजगी शुश्रूषागृह नाहरकत सादर करेपर्यंत जिल्हा कार्यालयास नोंदणी व नुतनीकरण (पुर्नःनोंदणी) प्रस्ताव सादर करु नये.

**(डॉ.विजयकुमार वाघ)**
**जिल्हा आरोग्य अधिकारी,**
**जिल्हा परिषद सांगली.**

**प्रत सविनय सादर,**

मा.जिल्हाधिकारी, सांगली
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा.सहसंचालक, आरोग्य सेवा (रुग्णालय व राज्यस्तर), मुंबई
मा.सहा.संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
मा.उपसंचालक, आरोग्य सेवा,कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर.